गोदातीर समाचार दि. 05/04/2022

दै. गोदातीर दि. 05/04/2022

# नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम अशा विविध जिल्ह्यांत पेट्रोल पंप लुटणाऱ्या टोळीला अर्धापूर पोलिसांनी पकडले



**नांदेड–** नांदेड, परभणी, हिंगोली-सह विदर्भातील विविध जिल्ह्यांत पेट्रोल पंप लुटणाऱ्या टोळीला अर्धापूर पोलिसांनी पकडले आहे.

दि. १४ मार्च रोजी पद्मावती पेट्रोल पंपाचे मॅनेजर दादाराव अशोक हाके (रा. नांदेड) हे पेट्रोल पंपावर जमा झालेली चार दिवसांची नऊ लाख ५४ हजार २२० रुपये रक्कम बॅगमध्ये टाकून सकाळी दहा वाजता मालेगाव येथील बँकेत जमा करण्यासाठी मोटारसायकलवर जात होते. धामदरी पाटीजवळ त्यांचे पाठी-मागून एका पल्सर मोटारसायकलवर तिघेजण तोंडाला कपडा बांधलेले अज्ञात चोरटे आले. त्यांनी दादाराव हाके यांचे मोटारसायकलला पाठीमागून लाथ मारून त्यांना पाडण्याचा प्रयत्न केला व त्यांचेजवळ असलेली पेट्रोल पंपाचे ९ लाख ५४ हजार २२० रुपये जबरीने चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पोलीस स्टेशन अर्धापूर येथे गुन्हा कलम ३९३ भारतीय दंड संहिताप्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे व उपविभागीय पोलीस अधिकारी अर्चना पाटील यांनी सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी

(पाच ५ वर...)

प्रजावाणी दि. 05/04/2022

दै. प्रजावाणी दि 05/04/2022

# पेट्रोलपंपावर लूटणारी टोळी जेरबंद

## धामदरी पाटीजवळ साडे नऊ लाख लुटण्याचा केला होता प्रयत्न

■ पाच लुटारू ताब्यात

■ अर्धापूर पोलिसांची कामगिरी

नांदेड, दि. ४ : बॅग लिफ्टींगच्या घटना एका पाठोपाठ घडत असताना त्या आरोपींचा शोध एकीकडे लागत नसताना दुसरीकडे अर्धापूर ते मालेगाव दरम्यान धामदरी पाटीजवळ पेट्रोलपंपाच्या व्यवस्थापकाकडे असलेले साडे नऊ लाख रुपये पळविण्याचा प्रयत्न केल्याची घटना १५ दिवसांपूर्वी समोर आल्याने चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान उभे केले होते. दरम्यान पेट्रोल पंपावर लुटमार करणारी टोळीला जेरबंद करण्यात अर्धापूर पोलिसांना यश आले. अर्धापूर पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले असून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

१४ मार्च रोजी पद्मावती पेट्रोंलपंपावरचे व्यवस्थापक दादाराव हाके हे विक्रीतून जमा झालेली साडे नऊ लाखाची रक्कम घेऊन मालेगाव येथील बँकेत भरण्यासाठी दुचाकीवरून अर्धापूरहून निघाले होते. यावेळी तोंडाला रुमाल बांधून